# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

३, महापालिका मार्ग, पत्रपेटी क्रमांक १९६७, मुंबई - ४०० ००१.
दुरध्वनी २२६२०६०१, २२६९०६०२, २२६४११५०/५१ फॅक्स २२६९०००७
E Mail-1)desk15dte@gmail.com 2) System@dte.org.in 3) Desk15@dtemaharashtra.gov.in


परिपत्रक

क्रमांकः-१५/अर्थस/ईबीसी ऑनलाईन /२०१६-१७/२७३

दिनांक : 27 FEB 2017

प्रति,

सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
मुंबई/पुणे/नाशिक/औरंगाबाद/अमरावती/नागपूर.

विषयः-"डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजना" शैक्षणिक वर्ष २०१६-१७ मध्ये प्रवेश घेतलेल्या आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील विद्यार्थ्याच्या योजनेच्या अंमलबजावणीबाबत...

संदर्भ :-१) उ. व तं.शि. विभागाचे शासन निर्णय क्र. टीईएम२०१६/प्र.क्र.५०१/तांशि-४, दि.१३ ऑक्टो., २०१६.
२) उ. व तं.शि. विभागाचे याचे पत्र क्र.संकीर्ण-२०१६/प्र.क्र.६०१/ताशि-४, दि.१३ फेब्रु.,२०१७

उपरोक्त विषयाबाबत संदर्भिय शासन पत्राच्या अनुषंगाने नमुद करण्यात येते की, या संचालनालयाच्या अधिपत्याखाली आर्थिक दुर्बल घटकातील विद्यार्थ्यासाठी डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजना" सन २०१६-१७ पासून सुरू करण्यात आली आहे. सदर योजना ज्यांचे पालक अल्पभुधारक शेतकरी आहेत किंवा नोंदणीकृत मजूर आहे अशा विद्यार्थ्यांकरिता आहे. शासन निर्णयातील निकषांची पूर्तता करणाऱ्या विद्यार्थ्यांना वसतीगृह निर्वाह भत्ता (Hostel Maintenance Allownce) देण्याचे आदेश आहेत. सदर योजनेच्या अंमलबजावणी संदर्भात संदर्भ क्र. २ अन्वये शासन स्तरावरून मार्गदर्शन प्राप्त झाले आहे तसेच पत्राची प्रत सोबत जोडत आहे. त्या अनुषंगाने प्राप्त अर्जाची छाननी करून संबधीत लाभार्थीना लाभ देण्यात यावा. तसेच आपल्या अधिनस्त असलेल्या संबधीत संस्थांना कळविण्यात यावे.

(डॉ. सुभाष महाजन)
संचालक,
तंत्रशिक्षण म. रा. मुंबई.

प्रत :- प्रणाली विश्लेषण तथा समन्वयक, कार्यासन क्रमांक -३, मुख्य कार्यालय, मुंबई यांच्या माहिती व योग्य त्या कार्यवाही करीता


सहसंचालक तंत्रशिक्षण
प्रादेशिक कार्यालय, नागपूर
आवक क्रमांक 1453
दिनांक 28 FEB 2017

महाराष्ट्र शासन

[illegible] २०१५/प्र.क्र. [illegible]

उच्च व तंत्र शिक्षण विभाग,

मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२

दिनांक : १३ फेब्रुवारी, २०१७.

प्रति,

संचालक,

तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य,

मुंबई- ४०० ००१

विषय :- "डॉ.पंजाबराव देशमुख वसतीगृह निर्वाह भत्ता योजना" शैक्षणिक वर्ष २०१६-१७ मध्ये प्रवेश घेतलेल्या आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांच्या योजनेच्या अंमलबजावणीबाबत

संदर्भ : आपले पत्र क्र. १५/तंशिस/अर्थसं/व.नि.भत्ता/२०१६-१७/१९२, दि.२३.१२.२०१६ चे पत्र

उपरोक्त विषयावरील संदर्भाधीन पत्रातील मुद्यांस अनुलक्षुन आपणास खालीलप्रमाणे कळविण्यात येत आहे.

१) एखाद्या संस्थेकडे वसतीगृह सुविधा उपलब्ध नाही, अशा संस्थेतील विद्यार्थी अल्पभूधारक शेतकरी किंवा नोंदणीकृत मजूर असेल संस्थेच्या जवळपासच्या परिसरात विद्यार्थी खाजगी ठिकाणी भाडेकरारावर वास्तव्यास असल्यास सदर विद्यार्थ्यास वसतीगृह निर्वाह भत्ता देय आहे का?

- होय.

२) विद्यार्थ्याचे पालक भूमीहीन शेतकरी असेल किंवा त्याच्याकडे महाराष्ट्रात कोठेही स्वतःच्या मालकीची भूमी नसेल परंतु इतर व्यवसाय, नोकरी, व्यापार करत असेल तर अशा विद्यार्थ्यास देय असणार काय?

- नाही.

३) विद्यार्थ्याच्या आजोबांच्या नावे शेती असून ते अल्पभूधारक शेतकरी असल्यास त्या विद्यार्थ्यास देय असेल काय?

नाही. केवळ ज्या विद्यार्थ्यांचे पालक अल्पभूधारक शेतकरी किंवा नोंदणीकृत मजूर आहेत, अशाच विद्यार्थ्यांना वसतिगृह निर्वाह भत्ता देय आहे.

४) विद्यार्थ्यांचे पालक नोंदणीकृत मजूर उदा.खाजगी कंपनीत, खाजगी ट्रस्टचे कर्मचारी,व्यावसायिक, शेतात काम करणारा मजूर, रोजंदारीवरचा मजूर यांना देय आहे काय?

- ज्या विद्यार्थ्यांचे पालक शासकीय अभिलेखानुसार “नोंदणीकृत मजूर” आहेत, अशा विद्यार्थ्यांना वसतिगृह निर्वाह भत्ता देय आहे.

५) वसतीगृहाचे प्रकार शासकीय वसतीगृह, खाजगी वसतीगृह, स्वयंचलित चालविले जाणारे वसतीगृह, ट्रस्टमार्फत चालविले जाणारे वसतीगृह या वसतिगृहांना समाजकल्याण विभागाची मान्यता असणे आवश्यक आहे काय किंवा कसे.

- वसतिगृहास समाजकल्याण विभागाच्या मान्यतेची आवश्यकता नाही.

६) अल्पभूधारक शेतकरी किंवा नोंदणीकृत मजूर यांना उत्पन्न मर्यादा किती असावी, प्रमाणपत्रामध्ये उत्पन्नाचा उल्लेख करून प्रमाणपत्र घेण्यात यावे किंवा कसे.

- अल्पभूधारक शेतकरी किंवा नोंदणीकृत मजूर पालकांकडून उत्पन्नाचे प्रमाणपत्र घेण्याची आवश्यकता नाही.

२. उपरोक्त बाबत दि.१३.१०.२०१६ च्या शासन निर्णयातील अटी व शर्ती स्वयंस्पष्ट असल्याने त्यानुसार कार्यवाही करण्यात यावी.

(म.मा.मोरवे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन